# जाहिरनामा

हिंगोली जिल्हयातील उपविभागीय दंडाधिकारी वसमत, उपविभाग यांचे कार्यालय.
पोलीस पाटील पदभरतीसाठी जाहिरात 2017
जाहिरात क्र.01/2017

हिंगोली जिल्हयातील वसमत, उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी, त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावांत पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक व्यक्तींकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.hingoli.gov.in या संकेतस्थळावरील http://hingoli.govbharti.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत | | लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे | अपात्रते बाबत उमेदवारांच्या हरकती असल्यास | परिक्षेची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बँक चलान द्वारे | RTGS, NEFT | | | |
| दि. 06/12/2017 रोजी सकाळी 10.00 वा.पासुन | दि. 20/12/2017 रोजी सायंकाळी 5.30 वा. पर्यंत | दि. 22/12/2017 रोजी बँक वेळे पर्यंत | दि. 22/12/2017 रोजी सायंकाळी 6.00 वा पर्यंत | दिनांक 26/12/2017 | दि. 26/12/2017 ते दि. 27/12/2017 रोजी सायंकाळी 05.00 वा. पर्यंत घेता येतील. | दि. 07/01/2018 रोजी दुपारी 12.00 ते 1.30 वा पर्यंत |

- उमेदवारांना प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन Download करण्याचा दिनांक 28.12.2017 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
- लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा दिनांक व वेळ लेखी परिक्षेच्या निकाला सोबत जाहिर करण्यात येईल.

सरळसेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात http://hingoli.govbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदारांनी संपुर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत व प्रिंट आऊट काढून घ्यावी. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील.

भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकुण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, वसमत (ता. वसमत व औंढा ना.) यांनी राखून ठेवलेला असून त्यांचा निर्णय अंतिम असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

## वसमत उपविभागा अंतर्गत प्रवर्ग निहाय भरती करावयाच्या पदाचा तपशिल

| प्रवर्ग | आरक्षणानुसार भरावयाची एकुण पदे | महिला आरक्षीत पदे | महिला आरक्षणा व्यतिरिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| अनुसूचित जाती | 18 | 05 | 13 | रकाना क्र. 03 मधील महिला आरक्षण पदे गाव निहाय आरक्षित करण्यात आली आहेत त्याचा तपशिल "परिशिष्ठ" मध्ये दर्शविला आहे. |
| अनुसूचित जमाती | 16 | 05 | 11 | |
| विशेष मागास प्रवर्ग | 05 | 02 | 03 | |
| विमुक्त जाती – अ | 07 | 02 | 05 | |
| भटक्या जमाती – ब | 06 | 02 | 04 | |
| भटक्या जमाती – क | 00 | 00 | 00 | |
| भटक्या जमाती – ड | 03 | 01 | 02 | |
| इतर मागासवर्ग | 42 | 13 | 29 | |
| खुला | 91 | 27 | 64 | |
| एकुण | 188 | 57 | 131 | |

उपविभागीय दंडाधिकारी, वसमत
तथा अध्यक्ष
( पोलीस पाटील पदभरती – 2017 निवड समिती )

## 'परिशिष्ठ'
## ( उपविभाग वसमत )

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुका | आरक्षणाचा प्रवर्ग | समांतर महिला आरक्षण (आहे / नाही) |
|---|---|---|---|---|
| 1 | कौडगांव | वसमत | अनुसूचित जाती | आहे |
| 2 | बेरुळा | औंढा ना. | अनुसूचित जाती | नाही |
| 3 | गणेशपुर | वसमत | अनुसूचित जाती | आहे |
| 4 | बारेपुरवाडी | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 5 | पांगरा सती | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 6 | गुंज तर्फे आसेगांव | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 7 | राजापुर | वसमत . | अनुसूचित जाती | नाही |
| 8 | सिंगी | वसमत | अनुसूचित जाती | आहे |
| 9 | म्हातारगांव | वसमत | अनुसूचित जाती | आहे |
| 10 | राजांळा | औंढा ना. | अनुसूचित जाती | नाही |
| 11 | लोळेश्वर | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 12 | दगडपिप्री | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 13 | कागबन | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 14 | रेवुलगांव | वसमत | अनुसूचित जाती | आहे |
| 15 | केळी | औंढा ना. | अनुसूचित जाती | नाही |
| 16 | खांबाळा | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 17 | येडुद | औंढा ना. | अनुसूचित जाती | नाही |
| 18 | मुरुंबा बु. | वसमत | अनुसूचित जाती | नाही |
| 19 | सोनवाडी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 20 | गवळेवाडी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | आहे |
| 21 | सारंगवाडी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | आहे |
| 22 | आमदरी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 23 | राजदरी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 24 | तळणी तर्फे औंढा | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 25 | नागेशवाडी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 26 | पिंपळदरी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 27 | भोसी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | आहे |
| 28 | चौंडी शहापुर | औंढा ना. | अनुसूचित जमाती | आहे |
| 29 | पिंपरी | वसमत | अनुसूचित जमाती | नाही |
| 30 | वाळकी | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 31 | राजवाडी | वसमत | अनुसूचित जमाती | नाही |
| 32 | नंदगांव | औंढा ना. | अनुसूचित जमाती | आहे |
| 33 | जामगव्हाण त. नां. | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |
| 34 | सांवगी मु. | औंढा ना. | अनुसूचित जमाती | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 35 | टाकळगाव | वसमत ✓ | विशेष मागास प्रवर्ग | नाही |
| 36 | भोरीपगांव | वसमत ✓ | विशेष मागास प्रवर्ग | नाही |
| 37 | ब्राम्हणगांव खु | वसमत ✓ | विशेष मागास प्रवर्ग | आहे |
| 38 | सेंदुरसना | औंढा ना. | विशेष मागास प्रवर्ग | आहे |
| 39 | चिंचोली नि. | औंढा ना. | विशेष मागास प्रवर्ग | नाही |
| 40 | संघनाईक तांडा | औंढा ना. | विमुक्त जाती – अ | आहे |
| 41 | लक्ष्मणनाईक तांडा | औंढा ना. | विमुक्त जाती – अ | नाही |
| 42 | तामटी तांडा | औंढा ना. | विमुक्त जाती – अ | नाही |
| 43 | काळापाणी तांडा | औंढा ना. | विमुक्त जाती – अ | नाही |
| 44 | केळी तांडा | औंढा ना. | विमुक्त जाती – अ | नाही |
| 45 | पाझर तांडा | औंढा ना. | विमुक्त जाती – अ | आहे |
| 46 | काठोडा तांडा | औंढा ना. | विमुक्त जाती – अ | नाही |
| 47 | वगरवाडी | औंढा ना. | भटक्या जमाती – ब | आहे |
| 48 | गोळेगाव | औंढा ना. | भटक्या जमाती – ब | नाही |
| 49 | मोहगाव | वसमत ✓ | भटक्या जमाती – ब | नाही |
| 50 | टाकळगव्हाण तर्फे शहापुर | औंढा ना. | भटक्या जमाती – ब | आहे |
| 51 | लहान | वसमत ✓ | भटक्या जमाती – ब | नाही |
| 52 | अंजनवाडा तांडा | औंढा ना. | भटक्या जमाती – ब | नाही |
| 53 | भगवा | औंढा ना. | भटक्या जमाती – ड | नाही |
| 54 | चिमेगाव | औंढा ना. | भटक्या जमाती – ड | नाही |
| 55 | हिवरखेडा | औंढा ना. | भटक्या जमाती – ड | आहे |
| 56 | पुरजळ | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 57 | महमदपुरवाडी | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | आहे |
| 58 | बोरगाव बु. | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | नाही |
| 59 | गिरगाव | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | नाही |
| 60 | लिंगी | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | आहे |
| 61 | सेलु | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | नाही |
| 62 | सावळी बे. | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 63 | आसेगांव | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | आहे |
| 64 | वाखारी | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | नाही |
| 65 | आजरसोंडा | औंढा ना. | इतर मागासवर्ग | आहे |
| 66 | लोहरा बु. | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 67 | वडद | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 68 | उखळी | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 69 | जांबराजा | औंढा ना. | इतर मागासवर्ग | आहे |
| 70 | बोरगाव खु | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | नाही |
| 71 | लाख | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 72 | थोरावा | वसमत ✓ | इतर मागासवर्ग | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 73 | रोडगा | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 74 | वाघी | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 75 | लोण बु | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 76 | खांडेगाव | वसमत | इतर मागासवर्ग | आहे |
| 77 | कानोसा | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 78 | नहाद | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 79 | वाई | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 80 | सिरळी | वसमत | इतर मागासवर्ग | आहे |
| 81 | माटेगाव | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 82 | मेथा | औंढा ना. | इतर मागासवर्ग | आहे |
| 83 | पुयणी बु. | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 84 | कन्हेरगांव | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 85 | कोंडशी बु | औंढा ना. | इतर मागासवर्ग | आहे |
| 86 | पोटा बु | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 87 | जलालदाभा | औंढा ना. | इतर मागासवर्ग | आहे |
| 88 | नागझारी | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 89 | जवळा तर्फे बाभुळगांव | वसमत | इतर मागासवर्ग | आहे |
| 90 | तेलगांव | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 91 | महागाव | वसमत | इतर मागासवर्ग | आहे |
| 92 | आरळ | वसमत | इतर मागासवर्ग | आहे |
| 93 | वसई | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 94 | पिंपळा | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 95 | उंडेगाव | औंढा ना. | इतर मागासवर्ग | नाही |
| 96 | आंबा | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 97 | कळंबा | वसमत | इतर मागासवर्ग | नाही |
| 98 | पारवा | वसमत | खुला | नाही |
| 99 | रायवाडी | वसमत | खुला | नाही |
| 100 | बगडद | वसमत | खुला | आहे |
| 101 | फाटा | वसमत | खुला | नाही |
| 102 | आसोंदा | औंढा ना. | खुला | नाही |
| 103 | खाजमापुर | वसमत | खुला | आहे |
| 104 | एकरूखा | वसमत | खुला | नाही |
| 105 | निशाणा | औंढा ना. | खुला | नाही |
| 106 | डिग्रस खु | वसमत | खुला | आहे |
| 107 | धारखेडा | औंढा ना. | खुला | नाही |
| 108 | नांदखेडा | औंढा ना. | खुला | आहे |
| 109 | रेणकापुर | वसमत | खुला | नाही |
| 110 | पळसगाव | वसमत | खुला | आहे |
| 111 | धामणगाव | वसमत | खुला | आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 112 | कुडाळा | वसमत | खुला | आहे |
| 113 | जुनुना | वसमत | खुला | नाही |
| 114 | पिंपळगाव कुटे | वसमत | खुला | नाही |
| 115 | जवळा बु. | वसमत | खुला | नाही |
| 116 | पिंपळाचौरे | वसमत | खुला | नाही |
| 117 | येहळेगाव (सो) | औंढा ना. | खुला | नाही |
| 118 | बोरी सावंत | वसमत | खुला | नाही |
| 119 | पांगरा तर्फे धामणगांव | वसमत | खुला | नाही |
| 120 | दाभडी | वसमत | खुला | नाही |
| 121 | ब्राम्हणगाव बु. | वसमत | खुला | नाही |
| 122 | जडगांव | औंढा ना. | खुला | नाही |
| 123 | सावंगी बु | वसमत | खुला | आहे |
| 124 | सोन्ना त. हटटा | वसमत | खुला | नाही |
| 125 | तुळजापुरवाडी | वसमत | खुला | नाही |
| 126 | उमरा | औंढा ना. | खुला | नाही |
| 127 | गुगणी खु. | वसमत | खुला | नाही |
| 128 | बाभुळगाव | वसमत | खुला | नाही |
| 129 | बोरजा | औंढा ना. | खुला | नाही |
| 130 | पळसगांव त माळवटा | वसमत | खुला | नाही |
| 131 | चिखली | वसमत | खुला | नाही |
| 132 | इंजनगांव | वसमत | खुला | नाही |
| 133 | हापसापुर | वसमत | खुला | नाही |
| 134 | टेंभुणी | वसमत | खुला | नाही |
| 135 | मरलापुर | वसमत | खुला | नाही |
| 136 | अनखळी | औंढा ना. | खुला | नाही |
| 137 | खंदारबन | वसमत | खुला | नाही |
| 138 | सोमठाणा | वसमत | खुला | नाही |
| 139 | माळवटा | वसमत | खुला | नाही |
| 140 | पोटा खुर्द | औंढा ना. | खुला | आहे |
| 141 | कोनाथा | वसमत | खुला | आहे |
| 142 | पांगरा शिंदे | वसमत | खुला | नाही |
| 143 | कंजारा | औंढा ना. | खुला | आहे |
| 144 | कोर्टा | वसमत | खुला | आहे |
| 145 | दौडगांव | औंढा ना. | खुला | नाही |
| 146 | फुलदाभा | औंढा ना. | खुला | नाही |
| 147 | कंरजाळा | वसमत | खुला | आहे |
| 148 | असोला त.लाख | औंढा ना. | खुला | नाही |
| 149 | जलालपुर | औंढा ना. | खुला | आहे |
| 150 | विरेगांव | वसमत | खुला | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 151 | कुरूंदवाडी | वसमत | खुला | नाही |
| 152 | सुकळी | वसमत | खुला | नाही |
| 153 | कोठारी | वसमत | खुला | नाही |
| 154 | हिरडगांव | वसमत | खुला | नाही |
| 155 | पिंपरी कुंडकर | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 156 | चौंढी तर्फे सेंदुरसना | वसमत | खुला | **आहे** |
| 157 | काठोडा | औंढा ना. | खुला | नाही |
| 158 | करंजी | वसमत | खुला | **आहे** |
| 159 | दुधाळा | औंढा ना. | खुला | नाही |
| 160 | ढवुळगांव | वसमत | खुला | नाही |
| 161 | पेरजाबाद | औंढा ना. | खुला | नाही |
| 162 | सुरवाडी | औंढा ना. | खुला | नाही |
| 163 | सावरखेडा | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 164 | अंजनवाडा | औंढा ना. | खुला | नाही |
| 165 | मरसुळ तर्फे सेंदुरसना | वसमत | खुला | नाही |
| 166 | रिरला तांडा | औंढा ना. | खुला | नाही |
| 167 | साळणा | औंढा ना. | खुला | नाही |
| 168 | माथा | औंढा ना. | खुला | नाही |
| 169 | मार्डी | औंढा ना. | खुला | नाही |
| 170 | कुपटी | वसमत | खुला | नाही |
| 171 | पांगरा तर्फे लाख | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 172 | वडचुना | औंढा ना. | खुला | नाही |
| 173 | रूपुर | औंढा ना. | खुला | नाही |
| 174 | दुरचुना | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 175 | लोहरा खुर्दे | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 176 | देवाळा तर्फे लाख | औंढा ना. | खुला | नाही |
| 177 | गोजेगाव | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 178 | ढेगज | औंढा ना. | खुला | नाही |
| 179 | ब्राम्हणवाडा | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 180 | वगरवाडी तांडा | औंढा ना. | खुला | नाही |
| 181 | दरेगाव | औंढा ना. | खुला | नाही |
| 182 | सावळी खु | औंढा ना. | खुला | नाही |
| 183 | पार्डी सावळी | औंढा ना. | खुला | नाही |
| 184 | कामठा | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 185 | गांगलवाडी | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 186 | राजापुर | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 187 | देवाळा तर्फे औंढा ना | औंढा ना. | खुला | **आहे** |
| 188 | दगडगाव | वसमत | खुला | नाही |

## किमान आवश्यक अर्हता :-

खाली नमुद केलेली अर्हता ( अर्ज स्विकृतीची सुरुवातीची तारीख 06/12/2017 ) या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | संवर्ग (पदनाम) | किमान आवश्यक अर्हता |
|---|---|---|
| 1 | पोलीस पाटील | 1. अर्जदार महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षेत (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.<br>2. (अ) वयोमर्यादे करीता अर्जदाराचे दिनांक 06/12/2017 रोजीचे वय विचारात घेतले जाईल. (ब) अर्जदाराचे वय दिनांक 06/12/2017 रोजी 25 वर्षापेक्षा कमी नसावे व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे. (क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथिलक्षम नाही.<br>3. अर्जदार, संबंधित गावाचा स्थानिक व कायम रहिवासी असावा.<br>4. अर्जदार शारिरीकदृष्ट्या सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक.<br>5. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे आवश्यक. (अर्जदार यांचे अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)<br>6. मागासप्रवर्गासाठी आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>7. मागासप्रवर्गातील अर्जदार (वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व.) यांना सन 2017-18 (31/03/2018) या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमिलेयर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>8. राखीव महिला पदांसाठी अर्ज सादर करणा-या महिला अर्जदारांना सन 2017-18 (31/03/2018) या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमिलेयर) प्रमाणपत्र आवश्यक राहील. |

## परीक्षेचे स्वरुप:-

| अ.क्र. | पदनाम/संवर्ग | परिक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलीस पाटील | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा (मुलाखत) | एकुण गुण |
| | | 80 | 20 | 100 |

## लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील.

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल. प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस.एस.सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल.
   यात सामान्यज्ञान, गणित, स्थानिक परिसराची माहिती व चालु घडामोडी इत्यादी विषयांचा समावेश असेल.
4. पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 80 गुणांच्या लेखी परीक्षेत किमान 36 गुण (45%) गुण प्राप्त करणारे उमेदवार तोंडी परीक्षेस पात्र ठरतील.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिमं/2010/209/प्र.क्र. 66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेनचा वापर करावा लागेल.

निवड कार्यपध्दती, अटी, शर्ती :-

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांना शैक्षणिक पात्रता व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा तोंडी परिक्षा/ अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
2. लेखी परिक्षा, तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सुचना या केवळ संकेत स्थळावरुन उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमा बाबत अद्यावत व सजग राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.
3. लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती परिक्षा शुल्क, मुळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल तसेच अशा अर्जदारांचे परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
4. अर्जदार शारिरीक दृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
5. अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6. अर्जदार कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंधित नसावा. अर्जदार हा नेमणूकीच्या गावी पुर्णवेळ स्थानिक स्वरुपाचा उदयोग करणारा नसावा. त्याच प्रमाणे इतर ठिकाणी संपुर्ण वेळ नौकरी वा धंदा करणारा नसावा. त्याच प्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा, तसेच खाजगी किंवा निम सरकारी संस्थेचा सदस्य नसावा अथवा पुर्ण वेळ नौकरी करणारा नसावा. या बाबतचे रुपये 200/- च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापत्र जाहिरातीच्या शेवटी जोडण्यात आलेले आहे.
7. पोलीस पाटील पदावरील नियुक्तीकरीता मृत/सेवा निवृत पोलीस पाटलाच्या वारसाने अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतू याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलाच्या वारसासह दोन किंवा अधिक अर्जदारांना **समान गुण** मिळाल्यास पोलीस पाटलाच्या वारसास निवडी मध्ये प्राधान्य देण्यात येईल. परंतू तो महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार त्या गावासाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहीजे व तो अन्यथा पात्र असला पाहिजे.
8. अर्जदार संबंधित गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक असून तहसिल कार्यालयाचे कायम रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.
9. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक/कायमचा रहिवासी असु शकतो सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.
10. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषांनुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासुनच अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरीक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करुन नये.) तसेच ज्या उमेदवाराकडे सदर पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व इतर पात्रता नसेल, अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.
11. संपुर्ण हिंगोली जिल्हयात सर्व उपविभागांसाठी एकाच दिवशी एकाच वेळी परीक्षा घेण्यात येईल.
12. संपुर्ण भरती प्रक्रिया गावनिहाय होणार असुन कोणत्याही दोन गावांच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
13. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
14. पोलीस पाटील हे पद एकाकी असल्याने अन्य समांतर आरक्षणे लागू नाहीत.

15. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-2011/ प्र.क्र.1064/2011/16-ब दि.12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र.2136/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहुन, तातुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल.
16. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.08) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेयर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील अर्जदारांकडे दिनांक 31 मार्च 2018 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेयरचे तत्व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील. तसेच त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.
17. शासन, महिला व बालविकास विभागकडील निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2 दिनांक 25/05/2001 आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या महिला अर्जदारांनी सन 2017-18 या कालावधीकरीता वैध असलेले ( दिनांक 31/03/2018 पर्यंत वैध असलेले ) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.
18. सामान्य प्रशासन विभागकडील शासन अधिसुचना क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र.17/2000/12 दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र.17/2000/12 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दि.28/03/2005 रोजी ह्यात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्ये बाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारानेही विहित (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.
19. पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 80 गुणांच्या लेखी परीक्षेत किमान 36 गुण (45%) गुण प्राप्त करणारे उमेदवार तोंडी परीक्षेस पात्र ठरतील. व लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास, पोलीस पाटील भरती/निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस हजर राहणे अनिवार्य राहील. तोंडी परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. मात्र उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदावरील निवडीकरिता पात्र राहील.
20. <u>समान गुण मिळाल्यास अंतिम निवड :-</u> शासन निर्णय क्रमांक बीव्हीपी 1113/1767/ प्र.क्र.592/पोल-8 दि.22/08/2014 अन्वये गुणवता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदारांना **समान गुण** मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.
   1. पोलीस पाटीलांचे वारस, त्यांनतर
   2. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर
   3. माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यांनतर
   4. वयाने ज्येष्ठ असलेले अर्जदार

   # पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि त्यांची दोन मुले यांचा समावेश. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नातेवाईकाचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.
21. याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटीसुध्दा बंधनकारक असतील.

22. हा जाहीरनामा प्रसिध्द होणे पुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदासाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत असे समजण्यात येईल व या जाहिराती नुसार नव्याने अर्ज करणे आवश्यक राहिल.

## <u>ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत</u> :-

1. <u>अर्ज करण्याची पध्दत</u> :- ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना http://hingoli.govbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवार त्याचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी भरु शकेल.
2. अर्ज करण्यापुर्वी उमेदवाराने खालील प्रमाणे नजीकच्या काळातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरीची स्कॅन इमेज soft copy स्वरुपात तयार करुन स्वत:कडे ठेवावीत.

| तपशील | Size Limit | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलिकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (Recent Photo Graph) | JPEG FORMAT मधील 150 KB पर्यंत | • लांबी/रुंदी प्रमाण (Proportion) 3.5 सें.मी. X 4.5 सें.मी. असावे.<br>• छायाचित्र समोर चेहरा असलेले असावे.<br>• छायाचित्राचा 75% भाग चेहरा असावा.<br>• छायाचित्र नजीकचे व स्पष्ट असावे. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील 150 KB पर्यंत | • कोऱ्या कागदावर गडद जाड पॉईंटच्या पेनने केलेली असावी.<br>• स्वाक्षरी स्पष्ट असावी व लांबी/रुंदी प्रमाण 2.5 सें.मी. X 1.5 सें.मी. असावे.<br>• रुलींग पेपर अथवा स्वाक्षरी व्यतिरिक्त इतर बाबी असलेल्या कागदाचा उपयोग करु नये. |
| चालान / RTGS, NEFT पावती ची Scanned Soft Copy | JPEG FORMAT मधील 50-500 KB पर्यंत | भरलेल्या बँकेच्या शिक्या सोबत चालान / RTGS, NEFT च्या पावतीची Scanned Soft Copy विहित वेळेत वेबसाईटला अपलोड करणे अत्यावशक आहे. त्यांशिवाय आपला अर्ज पात्र ठरवता येणार नाही. |

a) उमेदवाराचा फोटो, सही व बँकेत परीक्षा शुल्क भरलेल्या चालान / पावती व्यतिरिक्त कोणतेही प्रमाणपत्र /अभिलेख्यांची Soft Copy अर्ज भरताना सोबत जोडावयाची (Uplod करण्याची) आवश्यकता नाही. तथापी अशा सर्व प्रमाणपत्राच्या / अभिलेखांच्या मुळ प्रती छाननीच्या वेळी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल.
b) त्यानंतर Open होणाऱ्या पेजवरील पदाचे नाव निवडावे व अर्जातील इतर आवश्यक सर्व माहिती भरावी.
c) अर्जदाराने Upload केलेले Image सुस्पष्ट नसल्यास तो अपात्र ठरविला जाऊ शकतो.
d) सदर पेजवरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर submit यावर click करावे.
e) अर्जात भरलेली माहिती परिपुर्ण असल्यास येणाऱ्या मेसेज बॉक्समध्ये भरती प्रक्रीयेतील पुढील बाबींसाठी (उदा. अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेशपत्र काढणे इ.) जन्म तारीख आवश्यक असल्याने ती बरोबर असल्याची खात्री करा.
f) अर्जातील माहिती बरोबर असल्याची खात्री केल्यानंतर "Save & Continue" यावर Click करावे. त्यानंतर अर्जाचा ID, ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची अथवा विहीत केलेल्या बँकेत परीक्षा शुल्क जमा करण्याची अंतीम तारीख याबाबतची माहिती उमेदवारास दिसेल. तसेच अर्जात नमुद भ्रमनध्वनी क्रमांकावर व ई-मेलवर सदर माहिती पाठविण्यात येईल.
g) तयार झालेला Form ID भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने, तो उमेदवाराने सांभाळुन/नोंद करुन ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवाराला बदलता येणार नाही.

**परीक्षा शुल्क :-**

खालील प्रमाणे शुल्क विहित पध्दतीने भरावे लागेल.

| |
|---|
| खुला प्रवर्ग रु. 500/- |
| मागास प्रवर्ग रु. 300/- |
| चालान द्वारे भरल्यास बँकेने ठरविलेले बँक चार्जेस जादा लागतील |
| RTGS, NEFT पध्दतीने शुल्क भरल्यास नियमानुसार देय सर्विस चार्जेस जादा लागतील |

अर्जदारास परिक्षा शुल्क भरण्याची पध्दत -1 (Payment by Bank Challan), पध्दत -2 (RTGS, NEFT Payment) असे दोन पर्याय उपलब्ध असतील त्यापैकी एका पध्दतीचा अवलंब करुन परिक्षा शुल्क भरण्यात यावे.

- **पध्दत -1 (Payment by Bank Challan)** :- अर्जदाराने "Print Challan" यावर Click करुन चालानची प्रिंट घ्यावी. चालानची प्रिंट काढुन त्या चालान मार्फत उमेदवाराने चालनात नमुद असलेले आवश्यकतेनुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाचे कोणत्याही शाखेमध्ये, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत भरता येईल. चालनाच्या 2 प्रति पैकी एक प्रत बँकेकडून अर्जदारास दिली जाईल. बँकेकडून प्राप्त चालानची प्रत Scan करुन ऑनलाईन अर्ज भरतांना Upload करणे आवश्यक आहे.

  उमेदवाराची तोंडी परीक्षेकरीता निवड झाल्यास सदर चालान उमेदवाराने सादर करावयाचे असल्यामुळे उमेदवारांनी चालान ची प्रत सांभाळुन ठेवावी.

- **पध्दत -2 (RTGS, NEFT Payment)** :- उमेदवार कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये परीक्षा शुल्क RTGS, NEFT द्वारे बँक खाते क्र. 37301864626 व IFSC Code **SBIN 0006966** Account Name **पोलीस पाटील भरती – 2017** यावर भरु शकतात. RTGS, NEFT द्वारे भरणा केल्यानंतर UTR No. तसेच RTGS, NEFT पावती Scan करुन Upload करणे आवश्यक आहे.

  उमेदवाराने वरील पैकी कोणत्याही पध्दतीद्वारे परीक्षा शुल्क भरल्यानंतर चालान / RTGS, NEFT Receipt Upload करणे आवश्यक आहे. तसेच शुल्क भरल्यानंतर बँकेकडुन मिळणारा Journal No./Transaction No./UTR No. Website मध्ये भरणे अनिवार्य आहे.

h) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरल्याशिवाय Form भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही.

i) यानंतर उमेदवाराने "अर्जात नमुद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असून कोणतीही माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल याची जाणीव आहे." असे प्रतिज्ञापत्र मान्य करुन "Submit" यावर Click करावे.

j) अर्जाची पात्र/अपात्रतेची छाननी करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

k) अपात्र ठरलेल्या अर्जाचे बाबतीत आक्षेप असल्यास पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यापासुन दि. 27/12/2017 रोजी सायं 05.00 वा. पर्यंत **govrecruitmenthelp@gmail.com** या ई-मेल वर आपले म्हणणे कळवावे.

l) उमेदवाराने अर्ज करताना त्यांचा अचूक भ्रमनध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी हे रकाने भरणे अनिवार्य आहे त्यामुळे त्यांनी अशी माहिती दिल्यास त्यांना SMS व E-mail द्वारे त्यांच्या अर्जासंबंधीची वेळोवेळी विविध माहिती कळविणे शक्य होईल. परंतू उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमनध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण, तसेच भ्रमनध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवाराना प्राप्त न झाल्यास त्यावी संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमनध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना कार्यालय जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन, भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

m) अर्ज भरतेवेळी बँकेत भरलेल्या चालानची / पावतीची प्रत, मुळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी कार्यालयाकडे जमा करावी लागेल. सदर चालानची / पावतीची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी केली

जाणार नाहीत व त्यास अपात्र ठरविण्यात येईल. परीक्षा शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांका नंतर याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

n) वरील दिलेल्या विहित वेळेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया काढून टाकण्यात येईल.

o) अपात्र ठरत असलेल्या उमेदवारांना E-mail व SMS द्वारे कळविण्यात येईल. तसेच अपात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

p) सदर पदभरती प्रक्रियाबाबत काही अडचण असल्यास govrecruitmenthelp@gmail.com या ई-मेल संपर्कावर अडचणीचे स्वरुप कळविण्यात यावे.

q) लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने केवळ लेखी परीक्षेस बसू दिल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही.

r) उमेदवाराने भरलेल्या माहिती आधारे त्यास प्रवेशपत्र देऊन परिक्षेस पात्र करण्यात येईल निवड झालेल्या उमेदवाराची (Online) अर्जा प्रमाणे त्याची सर्व मुळ प्रमाणपत्रे / अभिलेखे याची सत्यता पडताळणी करण्यात येईल. सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने (Online) भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या माहिती व्यतिरिक्त सादर केलेल्या इतर कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. तसेच पडताळणी करताना उमेदवाराने (Online) भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या बाबीचे प्रमाणपत्र / अभिलेख तो सादर करण्यास असमर्थ ठरल्यास किंवा अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याला भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

s) अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी. खोटी व चुकीची माहिती अर्जात दिल्यास त्यासाठी उमेदवार व्यक्तीश: जबाबदार राहील.

**दाखल केलेल्या माहिती आधारे लेखी परीक्षेसाठी पात्र / अपात्र यादी प्रसिध्द करणे व प्रवेशपत्र प्राप्त करण्याचा कालबध्द कार्यक्रम**

| अ.क्रं. | पदाचे नाव | पात्र/अपात्र उमेदवारांची यादी ऑनलाईन प्रसिध्द करणे | उमेदवार ऑनलाईन प्रवेशपत्र प्राप्त करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | पोलीस पाटील | दिनांक 26/12/2017 | उमेदवारांना प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन Download करण्याबाबतची सूचना 28.12.2017 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |

अपात्र उमेदवारांना हरकती **दिनांक 26/12/2017 ते दिनांक 27/12/2017 रोजी सायंकाळी 05.00 वा.** पर्यंत घेता येतील. त्यानंतर प्राप्त आक्षेप / हरकतीचा विचार केला जाणार नाही. प्रवेशपत्र (हॉलतिकीट) पोस्टाने पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवाराने स्वत: विहित वेळेत आपले प्रवेशपत्र (हॉलतिकीट) डाऊनलोड करुन प्रिंट घ्यावी.

**विशेष सूचना:-**

1. नियुक्तीपूर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अद्यावत नॉनक्रिमीलेअर, स्थानिक रहिवाशी संबंधी महसुली पुरावा दाखला तसेच आवश्यक ती मुळ कागदपत्रे इत्यादीची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळयास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल. तसेच निवड समितीवर नियुक्ती संदर्भात कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
2. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 28.03.2005 नुसार म.ना.से. (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 नुसार प्रतिज्ञापत्र स्वाक्षरी करुन देणे अनिवार्य आहे. परंतु सदर प्रक्रीया Online पध्दतीची असल्यामुळे अर्ज भरताना उमेदवाराकडुन हे प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन घेणे आवश्यक नाही. करीता Online अर्ज भरताना

त्यामध्ये अपत्य संख्या टाकावयाची आहे. यानंतर परीक्षेच्या वेळेस प्रवेशपत्रावर सदर प्रमाणपत्र समाविष्ट करण्यात येईल. सदर प्रतिज्ञापत्र तोंडी मुलाखतीपूर्वी करण्यात येणाऱ्या कागदपत्र पडताळणी वेळी समक्ष सादर करणे अनिवार्य राहील.

3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणीक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कुठल्याही टप्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणर नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा व इतर अनुषंगीक बाबीची पात्रता तपासुनच ऑनलाईन अर्ज भरावा.
4. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांना ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडी बाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारास तोंडी परिक्षेस बोलावण्यात येईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराना भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष, निवड समिती यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
5. उमेदवाराने भरलेल्या माहिती आधारे त्यास प्रवेशपत्र देऊन परिक्षेस पात्र करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवाराची Online अर्जाप्रमाणे त्याची सर्व मुळ प्रमाणपत्रे / अभिलेखे यांची सत्यता पडताळणी करण्यात येईल. सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने Online भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या माहिती व्यतिरिक्त सादर केलेल्या इतर कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. तसेच पडताळणी करताना उमेदवाराने Online भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या बाबींचे प्रमाणपत्र / अभिलेख तो सादर करण्यास असमर्थ ठरल्यास किंवा अर्जा सोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याला भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
6. निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्र (उदा- शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र, स्थानिक रहिवासी असलेला महसुली पुरावा इतर अनुषंगीक कागदपत्र) सादर करणे बंधनकारक राहील.
7. परीक्षा केंद्रावर भ्रमणध्वनी, गणकयंत्र तसेच इतर आक्षेपार्ह वस्तु बाळगण्यास परवानगी राहणार नाही.
8. उमेदवाराने लेखी परिक्षेच्या वेळी स्वत:चा पॅड / काळया शाईचा बॉल पेन इ. आणणे आवश्यक राहील.
9. ज्या उमेदवारांनी वरील पदासाठी अर्ज केला आहे त्यांना लेखी परिक्षेस स्वखर्चाने यावे लागेल. कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
10. यापुढील सर्व माहिती जसे, पात्र / अपात्र उमेदवारांच्या याद्या, परिक्षार्थींचे Online प्रवेशपत्र, उमेदवारांची प्राप्त गुण यादी, **http://hingoli.govbharti.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
11. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.
12. निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती/अगर खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
13. या जाहिरातीतील नमुद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.
14. लेखी परिक्षेनंतर तोंडी मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या व दस्तऐवज पडताळणी करीता बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी उपविभागीय अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथील नोटीस बोर्डावर

तसेच या http://hingoli.govbharti.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत वेगळयाने लेखी सुचना पाठविण्यात येणार नाही. उमेदवार पात्र आहे किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत कोणत्याच पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. सदर पात्र यादीमध्ये नाव असणे म्हणजे उमेदवाराची सदर पदाकरीता निवड करण्यात आली असे होणार नाही. कागदपत्र पडताळणी नंतरच अध्यक्ष, निवड समितीच्या मान्यतेने पात्र उमेदवारांची अंतीम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

15. लेखी परिक्षा ज्या दिवशी होईल त्याच दिवशी दुपारी 02.00 वाआदर्श उत्तरतालीका (Answer Key) प्रकाशीत करण्यात येईल. त्यावर त्याच दिवशी सायंकाळी 05.45 पर्यंत **govrecruitmenthelp@gmail.com** या ई-मेल वर हरकती स्वीकारण्यात येतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हरकतीनुसार तथ्य असल्यास (Answer Key) सुधारीत करण्यात येईल. याबाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.
16. नैसर्गीक आपत्तीमुळे अथवा अन्य अपरिहार्य कारणामुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर निवड समिती ठरवून देईल त्याप्रमाणे सोयीच्या दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल.
17. एखाद्या उमेदवारांनी त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच तोतयेगिरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर पोलिस गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
18. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी / अपात्र ठरलेल्या अर्जदारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

विहित शैक्षणिक पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, विहित नमुन्यात नसलेले अर्ज, अपूर्ण मजकुर व चुकींचे भरलेले अर्ज, स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहित शुल्क न भरलेले अर्ज, विहित कालावधीत ऑनलाईन द्वारे प्राप्त न झालेले अर्ज याप्रमाणे इतर उणीवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार व तक्रार स्वीकारली जाणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**उपविभागीय दंडाधिकारी, वसमत**
**तथा अध्यक्ष**
**(पोलीस पाटील पदभरती – 2017 निवड समिती)**

# प्रतिज्ञापत्र

(रु. 200/- चे बॉंडपेपरवर)

मी ------------------------------------------------ रा. ---- ---------------- ता. --------------------

जि. हिंगोली. येथील रहिवासी असुन मी पोलीस पाटील भरती – 2017 ची लेखी परीक्षा दिली असुन खालील प्रमाणे अशी प्रतिज्ञा करतो / करते की,

1) मी कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नाही.

2) मी निवडीच्या गावी पुर्णवेळ स्थानिक स्वरुपाचा उद्योग करणार नाही.

3) मी इतर ठिकाणी पुर्णवेळ नौकरी व धंदा करणार नाही.

4) मी ग्रामपंचायत सदस्य नाही.

5) मी खाजगी किंवा निम सरकारी संस्थेचा सदस्य नाही.

वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता 1960 कलम 199 व 200 व अन्यं संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहिंन व माझी निवड रद्द होईल याची मला पुर्ण जाणिव आहे.

**दिनांक :-      /      /2017**

**प्रतिज्ञाधारकाची स्वाक्षरी**